लोकमत

# व्यवस्थापन परिषदेच्या २ जागांसाठी आज मतदान

## ५ जागा बिनविरोध : अधिसभेची आज बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेतून व्यवस्थापन परिषद सदस्यपदासाठी आठपैकी पाच उमेदवार बिनविरोध निवडून आले असून दोन उमेदवार निवडून देण्यासाठी आज, ८ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे. व्यवस्थापन परिषदेमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेसाठी एकही उमेदवार न मिळाल्याने ही जागा रिक्त राहणार आहे.

अधिसभेतून आठ उमेदवार व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून निवडून देण्यासाठी १८ जानेवारी रोजी अधिसूचना प्रसिद्ध झाली होती. प्राचार्य, शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर आणि व्यवस्थापन प्रतिनिधी यांच्यामधून प्रत्येकी दोन सदस्य निवडून द्यावयाचे होते. या निवडणुकीसाठी आज, नव्या अधिसभेची पहिली बैठक विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात दुपारी १२ वाजता होत आहे. यावेळी इतर अधिकार मंडळांवर सदस्यांचे नामनिर्देशन केले जाणार आहे.

व्यवस्थापन परिषदेतील ८ जागांपैकी एक जागा उमेदवार न मिळाल्याने रिक्त राहणार आहे. उर्वरित ७ पैकी ५ जागांवरील सदस्यांची निवड बिनविरोध झाली आहे. आता शिक्षक प्रवर्गातील खुल्या गटातील एक आणि नोंदणीकृत पदवीधर गटातील एका जागेसाठी निवडणूक होणार आहे. शिक्षक गटासाठी विद्यापीठ विकास आघाडीकडून रघुनाथ ढमकले, सुटाकडून मनोज गुजर आणि विश्वास वरेकर हे तीन तर नांदणीकृत पदवीधर गटातून विद्यापीठ विकास आघाडीकडून स्वागत परुळेकर आणि विरोधात श्वेता परुळेकर हे दोन उमेदवार रिंगणात आहेत.

या उमेदवारांच्या निवडीसाठी आज, अधिसभा बैठकीत मतदान होणार आहे.

जनसंपर्क कक्ष

08 FEB 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या १८ परीक्षा सुरळीत; ५,६९२ विद्यार्थी झाले सहभागी

## गोंधळ नाही : संपात सहभागी नसलेल्यांनी केले सहकार्य

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने पूर्वतयारी केल्यानुसार मंगळवारी दिवसभरात दोन टप्प्यात घेण्यात आलेल्या हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या १८ परीक्षा सुरळीत पार पडल्या. दिवसभरात विविध केंद्रांवरील ५,६९२ विद्यार्थ्यांनी या परीक्षा दिल्या. या परीक्षेदरम्यान कोणताही गोंधळ झाला नसल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्पष्ट केले आहे.

कर्मचारी सेवक संघाचे ४७ कर्मचारी मंगळवारीही बहिष्कार आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलनामुळे विद्यापीठाच्या ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षांच्या कामकाजात अधिविभागप्रमुख, शिक्षक, महाविद्यालयातील प्राचार्य, संपात सहभागी नसलेले शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्या सहकार्याने या परीक्षा मंगळवारी सुरळीतपणे पार पडल्या.

या झाल्या परीक्षा.

बीए, बीएसएस्सी, बीसीए, बीएबीएड, लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायन्स, एमकॉम, एमए, एमकॉम, एमएस्एस्सी, एमबीए, एमएसडब्ल्यू, नॅनो सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, टॅक्सेशन, रुरल स्टडीज अशा एकूण १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या.

### स्थगित परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

दि. २, ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी स्थगित केलेल्या आणि पूर्वी नियोजित असणाऱ्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर भेट देऊन अद्यावत माहिती घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग जाधव यांनी केले आहे.

### आठ गैरप्रकारांची नोंद

दरम्यान, भरारी पथकाकडून सोमवारी सांगली, कोल्हापूर व सातारा या तिन्ही जिल्ह्यांतून एकूण आठ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे केली आहे.



लोकमत

# विद्यापीठात टेरारियम कार्यशाळेला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आजीवन अध्ययन व विस्तार विभागात मंगळवारी घेण्यात आलेल्या एकदिवसीय मोफत टेरारियम कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांतर्गत सर्व अभ्यासक्रम समाजातील युवक-युवती, स्त्री-पुरुष, अशा सर्व कार्यशक्तीला प्रेरणा देणारे व जीवन कौशल्य शिकविणारे आहेत. जेष्ठ नागरिकांनी आनंदी जीवन कसे जगावे अशा पद्धतीचे अनेक उपक्रम घेतले जातात. टेरारियम हा व्यावसायिक दृष्टिकोन व आर्थिक गुणवत्ता वाढवणारा कार्यक्रम आहे,असे मत डॉ. एम. एस. देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले. २०२० चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, कौशल्य, रोजगार निर्माण करणारे, समानता देणारे शैक्षणिक धोरण आहे असेही डॉ. देशमुख यांनी यावेळी स्पष्ट केले.

टेरारियम कार्यशाळेचे मुख्य व्याख्याते अक्षय घोरपडे, अभिजित जाधव यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. सुमन बुवा यांनी प्रास्तविक केले. संचालक डॉ. आर. जी. पवार यांनी परिचय करून दिला. श्वेता आठवले यांनी आभार मानले. यावेळी उदय घाटे, प्रा. वाय. एस. बोकिल, आर. एम जाधव उपस्थित होते.

महासत्ता

# शिक्षक परिपूर्ण माणूस घडविण्याचे कार्य करतात-शिंदे

कोल्हापूर, ता.६ (प्रतिनिधी) -

शिक्षक हे परिपूर्ण माणूस घडविण्याचे कार्य करतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातील माजी विद्यार्थी स्नेहमेळावा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात भाषा, साहित्य आणि समाज या संदर्भातील परंपरा वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्राच्या वाङ्मयीन संस्कृतीत मराठी विभागाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य अशोक बाबर, प्रा. डॉ. गिरीश मोरे उपस्थित होते. त्यांनीही याप्रसंगी मार्गदर्शन केले. या प्रसंगी डॉ. रणधीर शिंदे, सोनाली नवांगुळ, डॉ.हिमांशू स्मार्त, चंद्रशेखर गायकवाड यांची मनोगते झाली. या प्रसंगी माजी विद्यार्थ्यांमार्फत डॉ. हिमांशू स्मार्त यांना एशियाटिक सोसायटीची अरूण टिकेकर फेलोशीप मिळाल्याबद्दल तसेच लेखक अनुवादक सोनाली नवांगुळ यांना महाराष्ट्र फाउंडेशनचा विशेष कार्य पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 FEB 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत परीक्षा सुरळीत सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत असणाऱ्या विविध महाविद्यालयांतील १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी एकूण ५६९२ विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांनी दि. २ फेब्रुवारीपासून आंदोलनाचा निर्णय घेतल्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार घातला आहे. पण अधिविभागातील अधिविभागप्रमुख, शिक्षक, महाविद्यालयातील प्राचार्य यांच्या सहकार्याने परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या आहेत.

दि.२,३ व ४ फेब्रुवारी रोजी पूर्वी नियोजित असणाऱ्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असून विद्यार्थ्यांनी अद्ययावत माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.

पुढारी

# बेसबॉल स्पर्धेत महावीर कॉलेज अजिंक्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय महिला बेसबॉल स्पर्धेत महावीर महाविद्यालयाच्या मुलींनी अजिंक्यपद पटकावले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर स्पर्धेचे उद्‍घाटन डॉ. सुरेशकुमार मलिक यांच्या हस्ते व क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या उपस्थितीत झाले.

महावीर कॉलेजने या स्पर्धेचे आयोजन केले होते. अंतिम सामन्यात महावीर महाविद्यालयाच्या मुलींनी एस. जी. एम. कॉलेज, कराड या संघाचा ६-४ असा पराभव केला. अटी-तटीच्या सामन्यात राष्ट्रीय खेळाडू स्वप्नाली वायदंडे, पिचर करिष्मा कुडचे, तसेच ऐश्वर्या पुरी, पल्लवी कांबळे, गायत्री जाधव यांच्या अष्टपैलू खेळामुळे महावीर महाविद्यालयाने तीन डावांत सहा धावा केल्या होत्या. याला कराडच्या मुलींनीसुद्धा जोरदार प्रतिउत्तर दिले; पण ऐनवेळी त्यांच्या खेळाडू कमी पडल्या. त्यामुळे त्यांच्या चारच धावा होऊ शकल्या. त्यामुळे महावीर कॉलेजने हा सामना ६ - ४ असा जिंकून अंतिम विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेतून गुवाहाटी येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला बेसबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघाची निवड करण्यात आली.

पुण्यनगरी

# 'जिल्हा विधी सेवा'ला विद्यार्थ्यांची भेट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास भेट देऊन 'मध्यस्थी' विषयावर पथनाट्य सादरीकरण केले. कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव प्रीतम पाटील, विद्यापीठाचे विधी विभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे उपाध्यक्ष विवेकानंद घाटगे, कौटुंबिक न्यायालयाच्या बार असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र पाटील उपस्थित होते. डॉ. धुपदाळे यांच्या हस्ते जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव प्रीतम पाटील यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. धुपदाळे, सचिव प्रीतम पाटील, ॲड. विवेकानंद घाडगे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रमोद दाभाडे, तर आभार प्रियंका गुरव यांनी मानले. यावेळी राजीव माने, राम गोपलानी, औदुंबर बनसोडे, जयदीप कदम, चंद्रकांत कुरणे, देवदास चौगले, ऋता निंबाळकर, अंजली करपे यांसह विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत



# विद्यापीठाची आज सिनेट सभा

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ नव्या अधिसभेची (सिनेट) पहिली बैठक ८ रोजी दुपारी १२ वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी निवडणूक होईल. इतर अधिकार मंडळांवर सदस्यांची नामनिर्देशनही केले जाणार आहे. निवडणूक नोव्हेंबरला दुसऱ्या आठवड्यात झाली. त्यानंतर सदस्य नामनिर्देशनाची प्रक्रिया सुरू झाली. व्यवस्थापन परिषदेतील ८ जागांपैकी एक जागा रिक्त आहे. उर्वरित ७ पैकी ५ जागांवर सदस्यांची बिनविरोध निवड झाली. यात संस्थाचालक गटातून पृथ्वीराज संजय पाटील यांची तर प्राचार्य गटामधून डॉ. व्ही. एम. पाटील, आर. व्ही. शेजवळ आणि शिक्षक गटातून प्रा. बबन सातपुते, नोंदणीकृत पदवीधर गटामधून अमरसिंह रजपूत आले. आता शिक्षक प्रवर्गातील खुल्या गटातील एक आणि नोंदणीकृत पदवीधर गटामधील एक जागेसाठी निवडणूक आहे. शिक्षक गटासाठी तीन, तर नोंदणीकृत पदवीधरमधून दोन उमेदवार रिंगणात आहेत.

तरूण भारत

# विद्यापीठाच्या विविध परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला आहे. तरीही अधिविभागप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मदतीने सोमवारपासून परीक्षा पूर्ववत करण्यात आल्या आहेत. मंगळवारी १८ अभ्यासक्रमासाठी ५ हजार ६९२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. एम. एस्सी., बी. एस्सी., एम. बी. ए., एम. कॉम., बी. ए., एम. एस. डब्ल्यू., बी. सी. ए., डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन यासह अन्य विषयांच्या परीक्षा झाल्या.

8 FEB 2023
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प. वि. विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाची शानदार कामगिरी

## तीन सामन्यात मिळवला एकतर्फी विजय

प्रतिनिधी
कोल्हापूर

पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने शानदार कामगिरी करत ३ सामने जिंकताना आपला दबदबाही निर्माण केला आहे. खेळलेल्या तिनही सामन्यात शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी गोलंदाजी, फलंदाजीसह क्षेत्ररक्षणातही कौशल्य दाखवून विरुद्ध संघांवर दबाव टाकला. हाच दबाव विद्यापीठ संघाला सामने जिंकण्यासाठी कामी आला. सिकर (राजस्थान) येथील पंडित दिनदयाल शेखावती विद्यापीठांतील मैदानात ही स्पर्धा सुरु आहे.

दरम्यान, स्पर्धेतील पहिल्यात सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाचा गुजरातमधील सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठावर दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ संघाने २० षटकात १८२ धावांचा पाऊस पाडला. यामध्ये चौफेर फटकेबाजी केलेल्या अनिमेष पाटीलने ६५, सुरज कोंढाळकरनेने ४५ तर जयेश पोळने २२ धावांचे योगदान राहिले. प्रत्युत्तरादाखल खेळलेल्या पटेल विद्यापीठ संघाचा डाव शिवाजी विद्यापीठ संघाने ११३ धावांवरच गुंडाळला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ संघाला ६९ धावांनी विजय मिळाला. या विजयात मोलाचा वाटा उचलत अथर्व शिंदे पाच बळी घेतले. दुसऱ्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने मुंबईतील एच. एस. एन. सी. विद्यापीठ संघावर विजय मिळवला. या सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना एचएसएनसी विद्यापीठाने २० षटकात नऊ बाद १२२ धावा केल्या होत्या. गोलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ संघाच्या अथर्व शिंदे, प्रथमेश पाटील व आर्य शहा यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठ संघाने अगदी सहज १२२ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. सुरज कोंढाळकर याने ३५ तर अनिमेष पाटीलने ३२ धावा व जयेश पोळने २५ धावा करत विद्यापीठ संघाला सामना जिंकून दिला. गांधीनगर (गुजरात) केव्हीएस विद्यापीठ संघासोबत शिवाजी विद्यापीठ संघाचा तिसरा सामना झाला. या सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठाने २० षटकात नऊ बाद १६६ धावा केल्या. यामध्ये सुरज कोंढाळकरने ४८, अनिमेष पाटीलने ४० धावा तर कर्णधार प्रथमेश पाटीलने ३० धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरादाखल खेळलेल्या केव्हीएस विद्यापीठ संघाला १२८ धावसंख्येवर रोखताना सर्व फलंदाजांना तंबूत पाठवले. शिवाजी विद्यापीठाचा गोलंदाज अथर्व शिंदेने तीन तर आर्य शहाने दोन बळी घेत शिवाजी विद्यापीठ संघाला तिसरा सामना जिंकून दिला. शिवाजी विद्यापीठ संघाला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रशिक्षक प्रा. संदीप पाटील व संघ व्यवस्थापक प्रा. देवदत्त महात्मे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



कोल्हापूर : प. वि. आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत शानदार कामगिरी करत ३ सामने जिंकलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.